(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

क्र.पोमसं/३-अ/पदो- रापोनि/८५/२०१६.
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- १८/०७/२०१७.

**वाचा:-** १. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१, व

२. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एस्आर्व्ही-२०१५/ प्र.क्र.१५६/कार्या.१२, दिनांक २८/०४/२०१५, अधिसूचना सुधारणा दि. १६/०७/२०१५ आणि अधिसूचना (दुसरी सुधारणा)दि. १५/०६/२०१७.

## आदेश

उपरोक्त संदर्भ क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे,महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ ( न ) चे पोट कलम (२), त्याखालील सुधारीत स्पष्टीकरणानुसार, व उपरोक्त संदर्भ क्र.२ मध्ये नमूद केलेल्या अधिसूचनांचे पालन करुन, पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, खालील नमूद केलेल्या राखीव पोलीस उपनिरीक्षकांना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ४ मध्ये महसूली विभागाचे वाटप करण्यात आले असून, रकाना क्र. ५ मध्ये दर्शविलेल्या घटकांत त्यांची राखीव पोलीस निरीक्षक पदावर **तात्पुरत्या स्वरूपात** कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून खालील अटींच्या अधिन राहून पदोन्नतीवर पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ.क्र | राखीव पोलीस उपनिरीक्षकाचे नांव | सध्याची नेमणूक | संदर्भ क्र. २ च्या तरतुदीनुसार वाटप करण्यात आलेला महसुली संवर्ग | राखीव पोलीस निरीक्षक पदावर तात्पुरत्या स्वरुपात दिलेल्या पदोन्नतीवरील नेमणूक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४. | ५. | ६. |
| १ | पांडुरंग प्रकाशराव दलाई | चंद्रपूर | औरंगाबाद-३ | पो.प्र.केंद्र, जालना | रिक्त पदात |
| २ | शहाजी भाऊराव उगले | पो.प्र.केंद्र, मरोळ | कोंकण-२ (१) | पो.प्र.केंद्र, मरोळ | रिक्त पदात |
| ३ | भास्कर सहादेवजी शेंडे | पो.प्र.केंद्र, नागपूर | कोंकण-१ (२) | रायगड | रिक्त पदात |
| ४ | रामदास नागेश पालशेतकर | पालघर | कोंकण-१ (१) | रत्नागिरी | रिक्त पदात |
| ५ | सुभाष वामनराव कावरे | पो.प्र.केंद्र, अकोला | नाशिक-२ | जळगांव | रिक्त पदात |
| ६ | दशरथ मारुती हाटकर | नवी मुंबई | नाशिक-१ | अहमदनगर | रिक्त पदात |
| ७ | रमेश सुकाजी चाकाटे | पो.प्र.केंद्र, जालना | कोंकण-१(३) | सिंधुदुर्ग | रिक्त पदात |
| ८ | गौतम तुकाराम खेडकर | पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड | पुणे-१ | पो.प्र.केंद्र, खंडाळा | रिक्त पदात |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | भरत रावसाहेब सावंत | बृहन्मुंबई | कोंकण-२ (२) | मुंबई शहर | रिक्त पदात |
| १० | औंदुबर गजेंद्र शेळके | उस्मानाबाद | कोंकण-२ (३) | मुंबई शहर | रिक्त पदात |
| ११ | शहादेव रामभाऊ पोकळे | पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड | औरंगाबाद-२ | नांदेड | रिक्त पदात |
| १२ | सुरेश जगन्नाथ चव्हाण | बृहन्मुंबई | नाशिक-३ | नाशिक शहर | रिक्त पदात |

२. उपरोक्त राखीव पोलीस उपनिरीक्षकांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा दिनांक त्याच दिवशी ह्या कार्यालयास कळवावा. तसेच, ते पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होताच, त्यांनी राखीव पोलीस निरीक्षकपदी कार्यभार स्विकारल्याचा दिनांक सुध्दा संबंधीत घटक प्रमुखांनी विनाविलंब ह्या कार्यालयास कळवावा.

३. सदर राखीव पोलीस उपनिरीक्षकांना देण्यात आलेली राखीव पोलीस निरीक्षक पदावरील **तात्पुरती पदोन्नती** ही खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे:-

**अ)** सदर पदोन्नती प्रथम ११ महिने, किंवा शासन, व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडून निवडसूचीस मान्यता मिळेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता असेल, व

**आ)** सदर तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधीत राखीव पोलीस उपनिरीक्षकांना नियमीत पदोन्नतीचे, व सेवाज्येष्ठतेचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत.

४. **वर नमूद केलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या राखीव पोलीस उपनिरीक्षकांपैकी एखद्याविरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल / निलंबनाची कारवाई केली असेल / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल, किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर, संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्याविरूध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास फॅक्सव्दारे तात्काळ पाठवावी, व पुढील आदेशांची वाट पहावी.**

५. उपरोक्त आदेशांत नमूद केलेल्या ज्या राखीव पोलीस उपनिरीक्षकांविरूध्द विभागीय चौकशी प्रलंबित आहे, अथवा विभागीय चौकशीत निर्गमीत केलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरू झालेली नाही, अशा राखीव पोलीस उपनिरीक्षकांकडून त्यांना भविष्यात होणारी शिक्षा ते पदोन्नतीच्या पदात भोगण्यास तयार असल्याबाबतचे त्यांच्याकडून दिनांकित स्वाक्षरी केलेले **लेखी हमीपत्र घेवून, व त्यास अधिन राहूनच** त्यांना पदोन्नतीवर सोडण्यात यावे. तसेच, संबंधीत राखीव पोलीस उपनिरीक्षकांना पदोन्नतीवर कार्यमुक्त केलेल्या आदेशांतही तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. सदर आदेशांची व त्यांच्या लेखी हमीपत्राची प्रत ह्या कार्यालयातील कार्यासन अधिकारी, १) का.क्र.३-अ २) का.क्र. ११ व ३) का.क्र.११-अ यांना स्वतंत्रपणे लक्षवेध करून, न चुकता सादर करावी. तसेच, त्याची प्रत संबंधीत राखीव पोलीस उपनिरीक्षक ज्या घटकात आता पदोन्नतीवर हजर होणार आहेत, त्या घटकप्रमुखांना देखील न चुकता पाठवावी. तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास कार्यासन क्र.३-अ यांना लक्षवेध करून सादर करावा.

६. **उपरोक्त आदेशांमधील राखीव पोलीस उपनिरीक्षक जर मागास प्रवर्गातील असतील तर, त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी झालेली असल्याची खातरजमा करावी. उपरोक्त आदेशांतील ज्या मागासवर्गीय पोलीस अधिकाऱ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल, त्यांचेकडून ते प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही संबंधीत घटकप्रमुखांनी करावी; तोपर्यंत त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करु नये.**

७. राखीव पोलीस उपनिरीक्षक ते राखीव पोलीस निरीक्षक पदावर देण्यात येणाऱ्या सर्व पदोन्नती मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठापुढील दाखल याचिका क्र. २७९७/२०१५ व याचिका क्र. ४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या अधिनस्त राहून देण्यात येत आहे.

८. राखीव पोलीस उपनिरीक्षकांना राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नतीवरील पदस्थापना, शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एस्आर्व्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या.१२, दिनांक २८/०४/२०१५, अधिसूचना सुधारणा दि. १६/०७/२०१५ आणि अधिसूचना (दुसरी सुधारणा) दि. १५/०६/२०१७ मधील तरतुदीनुसार देण्यात आलेली आहे

९. शासन पत्र, गृहविभाग, क्र.पीएमएन्-०१०८/प्र.क्र.८८३/पोल ५ ब, दि.२९/७/२००८ मध्ये नमूद केल्यानुसार, शासन निर्णय, गृहविभाग, क्र.पीएमएन्-०२९७/सीआर्-४७४/पोल-५ ब, दि.२६/२/२००४ अन्वये महाराष्ट्र पोलीस दलातील त्यावेळी राजपत्रीत "गट ब" असलेल्या पोलीस निरीक्षक पदाचा दर्जा वाढवून ते पद "गट अ" चे करण्यात आले आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-३२० नुसार राज्य शासनाच्या सेवेतील सर्व राजपत्रीत पदें लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येतात. याबाबत, आयोगास पाठविण्यात येणाऱ्या प्रस्तावास मिळणाऱ्या मंजुरीच्या अधिन राहून सदर पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१०. **तसेच, शासन पत्र, गृहविभाग, क्र.पीएमएन्-०१०८/प्र.क्र.१३४/पोल-५ ब, दि.२२/१०/२००८ अन्वये पोलीस निरीक्षकांपर्यंतच्या राजपत्रीत पदावरील पदोन्नती नियमित करण्याबाबतच्या आदेशांना शासन मान्यतेच्या अधिन राहून पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.**

**११.** सदर पदोन्नती आदेशांमधील राखीव पोलीस उपनिरीक्षक हे जर ओदशांमध्ये नमूद केलेल्या घटकांमध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते **ज्या घटकात कार्यरत आहेत, त्या घटकप्रमुखांनी** त्यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे ह्या कार्यालयास न चुकता कळवावे.

१२. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH या शिर्षाखाली देखील उपलब्ध होतील.

(सतीश माथुर)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

पोलीस आयुक्त, मुंबई शहर (सस्नेह सादर)
पोलीस आयुक्त, नवी मुंबई / नाशिक
पोलीस अधीक्षक, चंद्रपूर / पालघर / उस्मानाबाद / नांदेड / रायगड / रत्नागिरी / जळगांव / अहमदनगर / सिंधुदुर्ग
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ / नागपूर / अकोला /जालना / नानवीज-दौंड / बाभुळगांव-लातूर / खंडाळा

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथकें, म.रा.,मुंबई

प्रत सविनय सादर,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग,
दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

प्रत सस्नेह,

महालेखाकार-१ महाराष्ट्र राज्य, मुंबई / २ नागपूर

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे / जालना / रायगड / रत्नागिरी / जळगांव / अहमदनगर / सिंधुदुर्ग / नांदेड / नाशिक / उस्मानाबाद / अकोला / नागपूर / चंद्रपूर

प्रत:-

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई (सदर आदेश संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २/ ५-अ / ४०

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता